पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/५/कावि/१२४/२०२०
दिनांक - ११/०५/२०२०

प्रति,
मा. ..................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

**विषय** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा
दिनांक २०/०५/२०२० रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **मे-२०२०** ची मासिक मा.महापालिका सभा **बुधवार** दिनांक **२०/०५/२०२०** रोजी दुपारी **२.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## सूचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये)

### कार्यपत्रिका क्रमांक – ४३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **मे- २०२०** ची मासिक मा.महापालिका सभा **बुधवार** दिनांक **२०/०५/२०२०** रोजी दुपारी **२.००** वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

-----

### प्रश्नोत्तरे

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

------

### मा.स्थायी समितीचे ठराव

**विषय क्रमांक १) संदर्भ** – १) मा.सागर आंगोळकर, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव–
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.५९६५ दि.२७/११/२०१९
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४८३ दि.०६/०१/२०२०
४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४९६ दि.२०/०१/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करताना संबंधित जमिन मालकास मोबदला अदा करताना मा.महापालिका सभा ठराव क्र.३९९ दि. २१/११/२०१३ नुसार मंजूर कार्यपध्दतीत व धोरणानुसार कार्यवाही करावयाच्या प्रकरणात नुकसान भरपाई अदा करताना ३०% दिलासा रक्कम देण्यास मान्यता देणेत आली आहे. तदनंतर मा.महापालिका सभा ठराव क्र.७७४ दि.२०/११/२०१५ अन्वये सदर धोरणात बदल करून नविन भूसंपादन कायदा २०१३ मधील तरतूदी नुसार ज्या मिळकत धारकांचे क्षेत्र ० ते ३०० चौ मी. आहे अशा बाधित छोट्या छोट्या मिळकतधारकांना १००% दिलासा रक्कम व ३०० चौ.मी पेक्षा जास्त क्षेत्राचे भूखंड धारकांना ३०% दिलासा रक्कम या प्रमाणे मान्यता देणेत आलेली आहे. सबब, दि.२०/११/२०१५ नंतर ३०० चौ.मी. पेक्षा मोठ्या भूखंडाचे विभाजन करून तुकडा ३०० चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्राचा भूखंड केलेल्या सर्व प्रकरणात सांत्वना

रक्कम ३०% इतकीच देय राहिल यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

(**टिप-** दिनांक २०/०५/२०२० चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

-------

**<u>मा.विधी समितीचे ठराव</u>**

**विषय क्रमांक २) संदर्भ-** १) मा.विधी समितीकडील ठराव क्र.३३ दि.२०/३/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहराच्या हद्दीतील आजपर्यंत विविध वास्तुंना म्हणजेच चौक, उद्याने, रस्ते, वस्ती व इतरत्र ठिकाणी नामनिर्देशक फलक करण्यात आले आहेत. तसेच उड्डाणपुल व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इमारतींना देण्यात आलेले "महात्मा ज्योतिबा फुले" हे नाव चुकीचे असुन त्यात दुरुस्ती करून "महात्मा जोतीराव फुले" हे योग्य व महाराष्ट्र शासनाच्या वतीने वापरात असलेले नाव देणेस. तसा अध्यादेश काढणेस आणि आजपासून संपुर्ण महानगरपालिकेच्या कामकाजात सुद्धा "महात्मा जोतीराव फुले" असा उल्लेख करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ३) संदर्भ-** १) मा.विधी समितीकडील ठराव क्र.३७ दि.८/५/२०२० अन्वये.

श्री.सुरेश पुंडलिक साळुंके , मुख्य उद्यान अधिक्षक हे माहे फेब्रुवारी २०२० अखेर नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झालेले असून सदरचे पद रिक्त झालेले आहे. सदर मुख्य उद्यान अधिक्षक या पदावर उद्यान अधिक्षक पदावरील कार्यरत कर्मचा-यांपैकी श्री.दत्तात्रय नामदेव गायकवाड, उद्यान अधिक्षक हे सेवाजेष्ठ असुन सदर पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व अनुभव अर्हता धारण करीत आहेत. तरी मुख्य उद्यान अधिक्षक या पदावर श्री.दत्तात्रय नामदेव गायकवाड(उद्यान अधिक्षक) यांची पदोन्नतीने नेमणुक करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

-------

**<u>मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे</u>**

**विषय क्रमांक ४) संदर्भ–** १) मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/५६/२०२० दिनांक ६/०५/२०२०

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान" च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतःचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ६,४१,३४,९६१/- व १२,०५,३४,९७४/- असे एकुण र. रु. १८,४६,६९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/०४/२०२० अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे-

**प्रपत्र“अ”**

<table>
<tr><th colspan="2">महानगरपालिकेचे नाव</th><th>पिंपरी चिंचवड महानगरपालिका</th><th>शेरा</th></tr>
<tr><td colspan="2">जिल्हा</td><td>पुणे</td><td></td></tr>
<tr><td colspan="2">वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या</td><td>१८४०७</td><td></td></tr>
<tr><td colspan="2">केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या</td><td>१८४०७</td><td></td></tr>
<tr><td colspan="2">मंजूर अर्जांची एकूण संख्या</td><td>१५७४२</td><td></td></tr>
<tr><td>बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या</td><td>वैयक्तिक घरगुती शौचालय</td><td>एकुण बांधकाम पुर्ण-१५७६५</td><td>मनपामार्फतबांधकाम पुर्ण- १०९७३<br><br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ४७९२</td></tr>
<tr><td>बांधकाम पूर्ण</td><td>सामुदायिक</td><td>५८२ सीटस</td><td>महिला–२६२सिटस</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| झालेल्या शौचालयांची संख्या | शौचालय | | कामकाज पूर्ण<br><br>पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ११४१० लाभार्थी | GOI+GOM=६८४.६०लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = २२८.२० लाख | ULB =२०००/-हिस्सा |
| | **एकुण** | **९१२.८ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | १०८१९ लाभार्थी | GOI+GOM=६४९.१४लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =२१६.३८ लाख | ULB =२०००/-हिस्सा |
| | **एकुण** | **८६५.५२ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणे.

------

**<u>समित्यांचे अहवाल</u>**

**<u>मा.विधी समिती</u>**

**विषय क्रमांक ५)** अ) दि.२०/०२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणे.

-----

**<u>मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती</u>**

**विषय क्रमांक ६)** अ) दिनांक १०/१/२०२० व २४/१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक २४/१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणे.

------

## <u>मा.शिक्षण समिती सभा</u>

**विषय क्रमांक ७)** अ) दिनांक २०/२/२०२० व २७/२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणे.

------



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/५/कावि/१२४/२०२०
दिनांक : ११/५/२०२०

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस् ) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.